# शाळापूर्व तयारी अभियान

(आयोजकांसाठी)

महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सन २०१९ पासून कोविड-१९ या महामारीचा सर्वच घटकांवर परिणाम झाला. लहान मुलांनाही या जागतिक महामारीने बंदिस्त करून टाकले. याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावरही झालेला आहे. काही मुले येत्या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीत दाखल होतील, पण प्रत्यक्षात त्यांना अंगणवाडी किंवा बालवाडीचा अनुभवच घेता आलेला नाही. या मुलांची व्यवस्थितपणे शाळापूर्व तयारी होणे फार आवश्यक आहे, ज्यामुळे पुढे जाऊन त्यांना वाचन-लेखन शिकताना कोणतेही अडथळे येणार नाहीत आणि ते व्यवस्थितपणे शिकू शकतील. यासाठी मार्च - मे/जून २०२२ मध्ये आपण सर्वांनी मिळून, शाळापूर्व तयारी अभियान महाराष्ट्रभर चालवायचे आहे. या अभियानात गाव पातळीवर मुलांचे पालक, ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा आणि स्वयंसेवक (volunteers) यांची मुख्य भूमिका असेल. आपण समजून घेऊ की, या अभियानाचे स्वरूप काय आहे आणि आपल्याला नेमके काय करायचे आहे.

**स्टेप १**

### इयत्ता पहिलीत दाखल होणारी मुले व त्यांच्या पालकांची नोंद करणे.

इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या मुलांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना मेळाव्याबाबत माहिती द्यायची आहे. तसेच पालकांचे गट बनवायचे आहेत.

**आपल्याला काय करायचे आहे ?**

- इयत्ता पहिलीत दाखल होणारी मुले व त्यांच्या पालकांशी संपर्क साधायचा.
- अशा ४-५ पालकांचे मिळून बनविलेल्या या गटांच्या संपर्कात आपल्याला शेवटपर्यंत रहायचे.
- इयत्ता सहावी ते दहावीच्या मुलांना लहान मुलांचे समूह बनविण्यासाठी मार्गदर्शन करायचे.

**स्टेप २**

### शाळा, गाव, वस्ती स्तरावर शाळापूर्व तयारीचा पहिला मेळावा आयोजित करणे.

आपल्याला सगळ्यांच्या मदतीने पालकांसाठी व मुलांसाठी मेळाव्याचे आयोजन करायचे आहे. या मेळाव्यात विविध क्रियांद्वारे पालक आपल्या मुलांकडून कशाप्रकारे शाळापूर्व तयारी करून घेऊ शकतात याबाबत समजावून सांगायचे आहे. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या सर्व मुलांना शाळापूर्व तयारीचा एक संच दिला जाईल. पालकांना विकास पत्राच्या मदतीने कृती समजावून सांगायच्या आहेत.

**आपल्याला काय करायचे आहे ?**

- प्रत्येक शाळा, गाव, वस्ती स्तरावर मेळाव्याचे आयोजन करायचे.
- पहिल्यांदा मुलांचे मूल्यमापन करून विकास पत्र द्यायचे आणि मूल्यमापनाची माहिती स्वत:सोबत ठेवायची.
- पालक व बालकाला शाळापूर्व तयारीचा संच द्यायचा.
- टॅबलेट अथवा मोबाइलद्वारे व्हिडिओ दाखवून पालकांना ते काय करू शकतात याची माहिती द्यायची.

स्टेप
३

## पालक व मुले शाळापूर्व तयारीच्या कृती घरी तसेच गटांत करताना.

मेळाव्यानंतर पालक आपल्या मुलांकडून शाळापूर्व तयारी करायला सुरुवात करतील. या दरम्यान आठवड्यातून एकदा पालक गटांना कृती कशा कराव्यात याबद्दल मार्गदर्शन करायचे.

मार्च – मे/जून या दरम्यान १० ते १२ वेळा आपण पालक गटांना भेटणार आहोत. आयडिया कार्डच्या मदतीनेही आपण पालकांना मार्गदर्शन करणार आहोत.

### आपल्याला काय करायचे आहे ?

- जेव्हा पालक घरात व समूहामध्ये आपल्या मुलांच्या शाळापूर्व तयारीसाठी कृती करीत असतील तेव्हा गरजेनुसार पालकांच्या शंकांचे समाधान करायचे आणि त्यांना प्रोत्साहन द्यायचे.

प्रत्येक समूहाला आठवड्यातून एकदा भेटून आयडिया कार्डवर आधारित कृती करून घ्यायच्या आहेत. तसेच आयडिया कार्ड वरील सूचनेनुसार व्हिडिओ दाखवायचे आहेत.

स्टेप
४

## दुसरे मूल्यमापन आणि शाळापूर्व तयारी (मेळावा)

१० ते १२ आठवडे झाल्यानंतर मे/जून महिन्यात पुन्हा एकदा मेळावा आयोजित करणार आहोत. या मेळाव्यात विकास पत्राच्या मदतीने मुलांची प्रगती समजेल आणि शाळापूर्व तयारीचे प्रमाणपत्र दिले जाईल. जून २०२२ मध्ये पुन्हा शाळा सुरू होतील. यावेळी इयत्ता पहिलीत या मुलांचे विशेष स्वागत करण्यासाठी 'प्रवेशोत्सव' साजरा करायचा आहे.

### आपल्याला काय करायचे आहे ?

- दुसऱ्या मेळाव्याचे आयोजन.
- मुलांची प्रगती पाहून प्रमाणपत्र वितरण.
- गावातील मान्यवर व्यक्तींना बोलावून त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण.
- पालकांचे मनोगत ऐकणे.
- ही शाळापूर्व तयारी एखाद्या सणाप्रमाणे आनंदाने साजरी करायची आहे.




या चला! शाळेत पहिल्यांदाच जाणाऱ्या आपल्या मुलांची तयारी आपण मिळून करू या.

**!!! सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!!**